# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१३/ २०१५** **दिनांक ०२.०८.२०१५**
**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- दुपारी ०४.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ०२.०८.२०१५ रोजी दुपारी ०४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २४८०/ २०१५, दिनांक ०१ ऑगष्ट, २०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक ०२.०८.२०१५ रोजी दुपारी ०४.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री. विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सदस्य

उपस्थितीची नोंद घेण्यात येऊन, विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक २७.०७.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२३९** दिनांक २७.०७.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०२** **सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ निमित्त होणा-या गर्दीच्या पार्श्वभूमीवर करणेत आलेल्या कामाच्या सद्य:स्थितीचा आढावा घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२४०** (१) आजचे सभेत सिंहस्थ कुंभमेळयानिमित्त शिर्डी शहरामध्ये निर्माण करावयाच्या सोयी-सुविधांचा आढावा घेणेसाठी मा.डॉ.सौरव त्रिपाठी, पोलिस अधिक्षक, अहमदनगर व श्री.कुंदनकुमार सोनवणे, उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी हे उपस्थित होते. या सभेमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली.

कुंभमेळयाच्या पार्श्वभुमीवर निश्चीत केलेल्या ०७ वाहनतळांवर सुरक्षीततेच्या दृष्टीने ठराविक कालावधीसाठी भाडेतत्वावरील सी.सी.टी.व्ही. यंत्रणा उभारणेत यावी. तसेच मंदिर परिसराजवळही पोलीस विभागाच्या मार्गदर्शनाखाली काही सी.सी.टी.व्ही. कॅमेरे तातडीची बाब म्हणून भाडेतत्वावर बसविणेत यावे, असे समितीचे मत आहे.

सी.सी.टी.व्ही.कॅमेरे भाडेतत्वावर बसविण्यासाठी येणारा खर्च देणगीदार साईभक्त सोसण्यास तयार आहे, अशी माहिती कार्यकारी अधिकारी यांनी दिली.

शिर्डीमध्ये वाहने प्रवेश करताना व बाहेर पडताना अशा ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणे अत्यंत आवश्यक असून याकरीता संस्थान अधिकारी, पोलिस अधिकारी व उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांनी एकत्रित पहाणी करुन शिर्डी जवळ असलेल्या महत्वाच्या वाहनतळांवर सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेसाठीची जागा व कॅमे-यांची संख्या निश्चित करावी.

सदरहू भाडेतत्वावर सी.सी.टी.व्ही.यंत्रणा उभारणीकामीचा प्रस्ताव इच्छुक देणगीदार साईभक्तांना कळविणेत यावा व त्यांचे देणगीतुन त्यांचेच मार्फत सदरचे काम संस्थानच्या नियंत्रणाखाली करुन घेण्यात यावे.

तसेच ही यंत्रणा देणगी मिळत असल्याने त्याचा संस्थानला आर्थिक भार सहन करावा लागणार नाही. त्यामुळे सदरहु सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बसविण्याचे काम देणगीदार साईभक्ताकडून करुन घेण्यात यावे असे एकमताने ठरले.

(कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

(२) आपत्ती व्यवस्थापन संचालक, कर्नल सुपनेकर, यशदा, पुणे यांनी कुंभमेळयाच्या पार्श्वभूमीवर होणा-या गर्दीचे नियोजनासाठी दि.०१.०८.२०१५ रोजी काही सुचना केलेल्या आहेत की ज्या परिशिष्ठ म्हणून सोबत सादर केलेले आहेत. त्या सुचनांची अंमलबजावणी करणेसाठी त्वरीत आवश्यक ती उपाययोजना करणेत यावी, असे ठरले.

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

(३) गर्दीचे कालावधीत वाहनतळापासून मंदिराचे अंतर कमी असल्यामुळे श्रींचे दर्शनासाठी जास्तीत जास्त भक्त पायी चालतच येतील, त्याकरीता रस्त्याचे बाजूने दर्शनरांगेकरीता बॅरीकेटींग करणेत यावे. तसेच ज्या भक्तांना पायी येणे शक्य नाही (उदा. लहान मुले, वृध्द, अपंग) यांचेसाठी २५ बसेस शाही स्नानाच्या तारखेच्या वेळेस पाच-पाच दिवसांसाठी विना इंधन (इंधन संस्थानमार्फत पुरविणेत येईल) अधिग्रहीत करणेत याव्यात. याकामी संस्थानच्या २२ बसेसही वापरणेत याव्यात व त्यामधील २-४ बसेस इमर्जन्सीसाठी राखीव ठेवणेत याव्यात.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

(४) या कालावधीमध्ये गर्दीचे नियोजन करणेसाठी गेट नं.०३ व मुखदर्शन गेट पुर्णपणे बंद ठेवण्यात यावे. तसेच गेट नं.०२ मधून संस्थान कर्मचारी, गावकरी, वृध्द, अपंग व सन्माननीय व्यक्ती यांनाच प्रवेश देण्यात यावा. गेट नं.०४ चा वापर इमर्जन्सीसाठी करणेत यावा, याबाबत आदेश पारीत करणेत यावा. पोलिस व संस्थान कर्मचा-यांना गर्दीचे नियोजन कशा प्रकारे केलेले आहे, याची समज देण्यात यावी. तसेच गर्दीचे नियोजनासाठी कधीही वापरण्यात येणारे छोटे-छोटे ॲरो व ENTER/ EXIT अशा प्रकारचे बोर्ड बनवून ठेवणेत यावेत. यामधील EXIT बोर्ड Retro Reflective बनविणेत यावे.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन/बांधकाम विभागप्रमुख/ संरक्षण विभागप्रमुख/ जनसंपर्क कार्यालय)

(५) कुंभमेळयाच्या कालावधीमध्ये आपत्कालीन व्यवस्थेसाठी श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील १०० बेडस ठेवणेत यावेत व परिसरातील इतर हॉस्पिटलमधीलही काही बेडस राखीव ठेवणेबाबत कळविणेत यावे.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ वैद्यकिय अधिक्षक)

(६) तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, राहाता यांनी त्यांचेकडील जा.क्र.आरोग्य/ १६-१७-१८-१९-२०-२१-२२/ २०१५, दि.०१.०८.२०१५ रोजीचे पत्रांन्वये सिंहस्थ कुंभमेळयाच्या निमित्ताने लाखो भाविक शिर्डी येथे दर्शनास येणार असून त्यांना आरोग्य सेवा पुरविणेकरीता संस्थानमार्फत खालीलप्रमाणे मागण्या केलेल्या आहेत.

(A) आरोग्य सेवा पुरविणारे पथक व वाहनांसाठी स्टीकर, बॅनरची छपाई करुन मिळावी.

(B) वाहनतळ व निवासव्यवस्था येथे किटकजन्य आजारापासून संरक्षणाकरीता फॉगिंगसाठी १५० लि. पेट्रोल व ५०० लिटर डिझेल, याकामी येणारा रु.३९,६५०/- मात्र खर्च संस्थानकडून मिळावा.

(C) भाविकांना साथरोग आरोग्य सेवा पुरविणेकरीता Water Chloronation याकामी येणारा रु.१,८५,०००/- मात्र खर्च संस्थानकडून मिळावा.

(D) भाविकांना २४ तास आरोग्य सेवा पुरविणेकरीता १३ आरोग्य पथके स्थापन करणेत आलेली असून या आरोग्य पथकांकरीता केस पेपर, रजिस्टर, रिपोर्ट फॉर्मट तयार करणेकामी प्रत्येक पथकास रु.३०००/- मात्र याप्रमाणे रु.३९,०००/- मात्र खर्च संस्थानकडून मिळावा.

(E) सदर आरोग्य सेवा पुरविणेकरीता वैद्यकिय अधिकारी-५०, महिला आरोग्य सेविका- ४०, पुरुष आरोग्य सेवक- ४०, पुरुष वाहन चालक- ३० व औषध निर्माण अधिकारी- ३० कार्यरत राहणार असून सदर कालावधीमध्ये उपरोक्त अधिकारी/ कर्मचारी यांचे २२ दिवसासाठी एकूण रु.६,१६,०००/- मात्र मानधन संस्थानमार्फत मिळावे.

(F) १३ आरोग्य पथकांना आरोग्य सेवा पुरविणेकामी सोबतचे यादीप्रमाणे संस्थानकडून औषध साठा मिळावा.

(G) आरोग्य सेवा १३ आरोग्य पथक व ०५ पर्यवेक्षक पथक तसेच ०७ रुग्णवाहीका यांचे नियोजन करण्यात आलेले असून सदर पथकांचे वाहन व रुग्णवाहीका करीता २२ दिवसांकरीता इंधनव्यवस्थेकरीता रु.३,५२,०००/- मात्र अनुदान संस्थानमार्फत मिळावे.

तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, राहाता यांच्या उपरोक्त मागण्यांवर चर्चा होऊन, कुंभमेळा कालावधीसाठीच्या त्यांच्या मागण्यापैकी अधिकारी/ कर्मचारी यांचे मानधन वगळता, स्टीकर, बॅनरची छपाई करुन देण्यात यावी, पाणी शुध्दीकरणासाठी येणारा रु.१,८५,०००/- मात्र खर्च, तसेच केस पेपर, रजिष्टर, रिपोर्ट फॉर्मट तयार करणेकामी रु.३९,०००/- मात्र खर्च व त्यांच्या यादीमधील आवश्यक तो औषधसाठा उपलब्ध करुन देण्यात यावा. तसेच फॉगिंगसाठी व वाहनांसाठी संस्थानला इंधन पुरवित असलेल्या पेट्रोल पंपावरुन आवश्यक तेवढेच इंधन उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, राहाता यांचेकडून त्यांना देण्यात आलेला खर्च, औषधसाठा व इंधन यांचे वापराबाबतचा सविस्तर तपशिल घेण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक/ कुंभमेळा कक्षप्रमुख/ मुख्यलेखाधिकारी/ वाहन विभागप्रमुख)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

आयत्या वेळेचा

विषय नं.०१ **संस्थानच्या दैनंदिन झेरॉक्स कामासाठी तातडीने एक झेरॉक्स मशीन खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- सामान्य प्रशासन, वशी-१२ कडे दररोज संस्थानचे विविध विभागांकडील कागदपत्रे झेरॉक्स काढणेसाठी येतात. सध्या झेरॉक्स कामासाठी खालीलप्रमाणे दोन झेरॉक्स मशीन वापरात आहेत.

| अ. नं. | मशीनचा तपशिल | मशीन खरेदी केल्याची तारीख | मशीनची आयुष्य मर्यादा/ कॉपीज संख्या | मशीनची किंमत | दि.२८/०७/२०१५ अखेर झालेल्या झेरॉक्स प्रती | मशीनची सध्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशीन-मॉडेल-७५५६ | २१/०२/२०१२ | १५ लाख कॉपीज (किंवा०५वर्षे वापर) | रुपये-८,३९,०००/- (देणगी) | १०,६८,५१० प्रती (कलर/ब्लॅक मशीन) | मशीन चालू आहे. (FSMA कॉन्ट्रक्ट केले आहे) |
| ०२ | झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशीन-मॉडेल-५७५५ | ११/१०/२०१२ | १० लाख कॉपीज (किंवा०५वर्षे वापर) | रुपये-६५१,०००/- (खरेदी) | ६,६९,८१४ प्रती | मशीन चालू असून सतत बंद पडते. |

संस्थानच्या सर्व विभागांच्या दैनदीन वापरासाठी लागणाऱ्या कागदपत्रांच्या झेरॉक्स, आदेश, परीपत्रके, तसेच माहीती अधिकार कायद्यान्वये मागीतलेल्या माहीतीच्या झेरॉक्स, कोर्ट कामासाठी लागणारे कागदपत्रांच्या झेरॉक्स, मा. व्यवस्थापन

समितीच्या सभेपूढील विषयांच्या टिपण्या, व कार्यवाहीच्या झेरॉक्स, कर्मचाऱ्यांचे वार्षीक १६ नं फॉर्म, व इतर संस्थान कागदपत्रांच्या झेरॉक्सचे व प्रिंटींगचे काम वरील झेरॉक्स मशीनवर केले जाते.

उपरोक्त कामासाठी वरील प्रमाणे ०२ मशीनचा वापर केला जात आहे. सध्या वरील तक्त्यातील अ. नं.०२ मॉडेल नं.५७५५ हे मशीन सतत बंद पडत आहे. सदरचे मशीन वेळोवेळी दुरुस्त करुनही तें नेहमीच बंद पडत आहे. दोन वेळेस दुरुस्ती केलेले आहे. परंतू ते व्यवस्थित चालत नाही. झेरॉक्सचे इंजिनिअर (औरंगाबाद) यांनी दि.२३/०७/२०१५ रोजी येऊन सदर मशीनची पहाणी केली असून, सदर मशीनचे Paper Path Assembly, Developer, Gear, ADFS, Feed Roller अशा प्रकारचे पार्ट गेलेले आहेत. या मशीनवर खर्च करुन मशीन किती दिवस चांगले चालेल, याबाबत सांगता येत नाही. सदर मशीनवर त्याचे क्षमतेनुसार ७५% झेरॉक्स प्रती काढलेल्या आहेत. त्यामुळे ते केव्हाही बंद पडू शकते. सध्या वरील एक मशीन सतत बंद पडत असल्यामुळे एका मशीनवर कामाचा लोड वाढलेला आहे. लोड वाढल्यामुळे हे मशीनही अचानक बंद पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे संस्थान कामासाठी सध्या एक चांगल्या प्रतीचे झेरॉकस मशीन खरेदी करण्याची आवश्यकता आहे. संस्थान कामासाठी आरसी (रिकन्डीशन) मशीन प्रती मिनीट ७० कॉपीज स्पीडचे मशीन घेणे गरजेचे आहे. शासनाचे सध्याचे Rate Contract मध्ये संस्थान कामासाठी आवश्यक असलेले हाय स्पीडचे मशीन आढळून येत नाही.

या कामासाठी A3, A4, Legal Size, Copier Printer, Scanner, 4 tray, DADF, Duplex, PS KIT, Pre Minute 70 Copies, One Year Free Service, ( एक वर्ष मोफत सर्व्हीस देणे) या अटी/शर्ती ठेऊन अशा पदध्तीचे एक चांगले प्रतीचे झेरॉक्स मशीन खरेदी करणे गरजेचे असून याकामी अंदाजे रुपये ०३ लाख रकमेच्या आत खर्च अपेक्षित आहे.

तरी विहीत पध्दतीने कोटेशन मागवून एक आरसी (रिकन्डीशन) मशीन खरेदीकामी प्रस्तावास मान्यता असावी.

प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

निर्णय क्र.२४१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे संस्थानच्या दैनंदिन झेरॉक्स कामासाठी एक नविन झेरॉक्स मशीन खरेदी करणेकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेत यावे, असे ठरले.**

**तसेच सदरहु खरेदीकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-१२)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ **नाशिक सिहंस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात नियोजीत वाहनतळांवर साईभक्तांचे सोयीसाठी पोर्टेबल टॉयलेट व युरीनल्स भाडेतत्वावर घेणेकामी प्राप्त निविदांवर निर्णय होणेबाबत.**

प्रस्ताव- विषयांकीत निविदा प्रक्रियेबाबत व्दितीय निम्नतम निविदाधारक मे. साराप्लास्ट प्रा. लि., पुणे यांनी दि.०९/०७/२०१५ चे पत्राव्दारे मा. अध्यक्ष सो. यांचेकडे हरकत दाखल केली होती. या कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदांमधिल वित्तीय देकारांचा तुलनात्मक तपशिल खालिलप्रमाणे आहे.

**Estimated Value : Rs.66,36,000/-.**

| Sr. No. | Name of Contractor | Quoted Amount (Rs.) | Remarks |
|---|---|---|---|
| **01)** | **YLDA India Pvt. Ltd., Pune.** | **61,44,000/-** | **L1** |
| 02) | Saraplast Pvt. Ltd., Pune. | 72,96,000/- | L2 |
| 03) | Windoors International Ltd., Mumbai. | 2,03,16,000/- | L3 |

उपरोक्त विषयांकीत कामाचे ई-निविदांचे तुलनात्मक तक्त्यानुसार याकामासाठी ठेकेदार वायएलडीए इंडिया प्रा. लि., पुणे यांचे दर निम्नतम आलेले आहेत. मे. साराप्लास्ट प्रा. लि. पुणे यांनी त्यांचे हरकतीमध्ये नमूद केलेले मुद्दे व त्याविषयीचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.

| अ. न. | उपस्थित मुद्दा | खुलासा |
|---|---|---|
| १. | पहिल्या वेळी राबविणेत आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये मे.वायएलडीए इंडीया प्रा.लि. यांना अपात्र ठरविण्यात आले होते. | वायएलडीए इं. प्रा. लि. यांनी पहिल्या वेळचे निविदा प्रक्रियेत तांत्रिक निविदेमध्ये इपीएफ नोंदणी विषयी कुठलेही कागदपत्र सादर केलेले नव्हते. त्यामुळे त्यांना अपात्र ठरविण्यात आले. तथापी यावेळी फक्त दोनच निविदा सादरकर्ते पात्र ठरल्याने दुस-यांदा निविदा मागविणेत आल्या. |
| २. | वायएलडीए प्रा. लि. यांनी सादर केलेल्या तांत्रिक निविदेत त्यांनी केलेले काम/अनुभव हा मे. जीआरबी इन्फास्ट्रक्चर यांच्या नावे असून ती स्वतंत्र Legal enitity आहे. | वायएलडीए इंडीया प्रा. लि. यांनी त्यांचे तांत्रिक निविदेत Goa State Infrastructure Development Corporation Limited (GSIDC) या संस्थेकरीता केलेल्या कामाचे पूर्णत्व प्रमाणपत्र जोडलेले आहे. त्यामध्ये M/s. GRB Infrastructure यांनी सदरहु काम केलेले असून ते मे. वायएलडीए इंडीया प्रा. लि. यांचे अधिकृत वितरक असल्याचे नमूद केलेले आहे. त्यामुळे सदरहु अनुभवाचे प्रमाणपत्र पात्रतेसाठी ग्राह्य धरण्यात आलेले आहे. याबाबत श्री. मोहित मल्होत्रा, Director, YLDA India Pvt. Ltd. यांचेशी चर्चा केली असता त्यांनी खालिल कागदपत्रांच्या प्रती सादर केल्या असून त्या सोबत अवलोकनार्थ जोडल्या आहेत.<br>१) M/s YLDA India Pvt. Ltd; व M/s GRB Infrastructure यांचे दरम्यान झालेला करारनामा:- यावरुन असे दिसून येते की, YLDA India यांनी delivery, Pick-up, maintenance, Cleaning Services and Stocking of portable toilets या सेवा पूरविण्याचे हक्क GRB Infrastructure यांना दिले आहेत. व त्यांची Service Provider म्हणून नेमणूक केली आहे.<br>२) Antonella Diana, CEO, YLDA Group S.P.A. यांनी दिलेला दाखला दि. २२/०७/२०१५- याव्दारे असा दाखला दिला आहे की, Sebach S. R. L. ही इटली या |

| | | |
|---|---|---|
| | - - | देशातील सर्वात मोठी पोर्टेबल टॉयलेट सेवा देणारी कंपनी असून ती YLDA Group S.P.A. यांचे मालकीची आहे.<br>YLDA Group S.P.A. यांनी फेब्रुवारी २०१३ मध्ये YLDA India Pvt. Ltd. ही उपकंपनी स्थापन केली आहे.<br>Sebach S.R.L. यांनी सन-२०१४ मध्ये इटली येथिल पोर्टेबल टॉयलेटसचे खालिल सेवा प्रकल्प केलेले आहेत.<br>a) Agesci (Italian guides and scouts association): a 4 days event held in San Rossore (PI) in August 2014 with: 1) 1508 Toilets 2) 762 Showers 3) 100 handwashes.<br>b) Italian Alpine troops muster: a 3 days event from the 15th to the 17th of May 2015 held in Aquila with: 1) 628 Toilets 2) 35 Wheelchair accessible toilets 3) 40 waste tanks 4) 24 Containers<br>याबाबत Sebach Ltd. यांनी AGESCI यांचेशी केलेल्या Lease Agreement ची प्रत सादर केली आहे. त्यानुसार सदर भाडेतत्वावर पोर्टेबल टॉयलेटस् कामाची किंमत ८,४१,८००/- Euro इतकी आहे. प्रचलित विनिमय दराने भारतीय रुपयातील सदर किंमत रु. ५,८९,२६,०००/- मात्र इतकी होते. |
| ३. | दुस-यावेळी रावविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये M/s.YLDA यांनी सादर केलेल्या तांत्रीक निविदेत ईपीएफ नोंदणीकरीता अर्ज सादर केल्याचे नमूद केले आहेः | M/s.YLDA यांनी सदर तांत्रीक निविदेत ईपीएफ नोंदणीकरीता सादर केलेल्या अर्जाची प्रींट आऊट जोडलेली आहे. तसेच दि.०८/०७/२०१५ रोजी तांत्रीक निविदा उघडणेत आल्या त्यावेळी उपस्थित असलेल्या M/s.YLDA यांचे प्रतिनिधी श्री.देशपांडे यांनी त्यांना ईपीएफ चा कोड नंबर प्राप्त झालेला असल्याचे सांगितले. त्यामुळे त्यांना पात्र ठरविण्यात आले. याबाबत ईपीएफ कार्यालयाकडून दि.०७/०७/२०१५ रोजी त्यांना प्राप्त झालेल्या ई-मेलची प्रत सादर केली असून त्याची प्रींट सोबत अवलोकनार्थ जोडली आहे. |

मे.साराप्लास्ट प्रा.लि., पुणे यांचे वर नमूद दि.०९/०७/२०१५ रोजीचे पत्रातील हरकतींबाबत निर्णय होणेसाठी दि.२७/०७/२०१५ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे प्रस्ताव सादर करणेत आला होता, त्यावर सविस्तर चर्चा होऊन, वरीलपैकी व्दितीय व तृतीय निम्नतम दरधारक यांचेशी मा. कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष चर्चा करुन त्यांचेपैकी जे ठेकेदार वर नमूद निम्नतम दरधारक यांचे दरात काम करण्यास तयार असतील, त्यांचेकडून काम करुन घ्यावे असे ठरले आहे.

त्यानुसार दि.२८/०७/२०१५ रोजीचे टिपणीअन्वये मंजुरी घेऊन ठेकेदार मे. साराप्लास्ट प्रा. लि., पुणे व विंडोर्स इंटरनॅशनल लि., मुंबई यांना दि.२८/०७/२०१५ रोजीचे पत्रान्वये तसेच ई-मेलव्दारे सुचित करणेत येऊन दि.२९/०७/२०१५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे समोर बोलविण्यात आले. त्यानुसार सदर दिवशी ठेकेदार यांचे खालिल प्रतिनिधी उपस्थित होते.

१. श्री. शैलेश क्षिरसागर, साराप्लास्ट प्रा. लि., पुणे.
२. श्री. राहुल गुजराथी, विंडोर्स इंटरनॅशनल लि., मुंबई.

तसेच यावेळी उपकार्यकारी अधिकारी, उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), उप अभियंता (बांधकाम) हे उपस्थित होते. त्यावेळी मा.कार्यकारी अधिकारी यांनी सदर ठेकेदारांना निम्नतम दरधारक यांची निविदा रक्कम रु.६१,४४,०००/- मात्र इतकी असल्याचे सांगून सदर रकमेत काम करण्याची तयारी आहे काय याविषयी विचारणा केली. त्यावर वरील दोन्ही प्रतिनिधींनी निम्नतम दरात काम करणेस असमर्थता दर्शविली. त्यावर मा. कार्यकारी अधिकारी यांनी वर नमूद निम्नतम दराने काम करण्याची तयारी नसलेस त्यांनी देऊ केलेल्या ई-निविदा दरात काही सवलत देण्याची तयारी असल्यास तसा सुधारीत दर प्रस्ताव देणेची विनंती केली. त्यानुसार सदर ठेकेदारांनी दिलेल्या सुधारीत दर प्रस्तावांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of Contractor | Quoted Amount | Revised Offer Amount | Remarks |
|---|---|---|---|---|
| 01) | Saraplast Pvt. Ltd., Pune. | Rs.72,96,000/- | Rs.70,00,000/- + Service Tax @ 14% = Rs.79,80,000/-. | with renewed terms and conditions for payment and type and model of toilet.<br>FRP toilets or any other suitable material for toilets.<br>Water & Electricity to be provided by the trust free of charge. |
| 02) | Windoors International Ltd., Mumbai. | Rs. 2,03,16,000/- | Rs. 1,19,00,000/-. | ---- |

त्यानंतर मे. साराप्लास्ट प्रा. लि. पुणे यांनी दि. ३१/०७/२०१५ रोजीचे ईमेलव्दारे खालीलप्रमाणे सुधारीत दर प्रस्ताव दिला आहे.

"On the request of The Executive office we once again provide a final rate for the works which we have accepted. We now finally submit a rate of Rs. 70,00,000/- (Rupees Seventy lac Only) for FRP toilets or any other suitable material for toilets, connected to drain where drainage lines is within 5-10 metre distance with water and electricity provided by the trust free of charge".

मे. साराप्लास्ट यांनी वरील ई-पत्रामध्ये काही अटी नमूद केल्याचे दिसून येते. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) दिलेला सुधारीत दर रु. ७०,००,०००/- मात्र हा FRP toilets or any other suitable material for toilets असा दिला आहे:- याबाबत निविदा शर्तीनुसार (Comman set fo Deviations S.No.1) "Portable toilets and urinal cabins shall be made of FRP/HDPE material only". अशी तरतूद आहे.

२) " ---- Connected to drain where drainage line is within 5-10 metre disteance". अशी अट नमूद आहे:- निविदा शर्तीनुसार एकूण १६० टॉयलेट व १६० युरीनल्स पैकी १४० टॉयलेट व १४० युरिनल्ससाठी ठेकेदार यांनी सेप्टीक टॅकची व्यवस्था करावयाची आहे. तसेच सेप्टीक टॅकमधील मैला उपसणे व दिलेल्या जागी डिस्पोज करणेसाठी Suction Vehicle ची व्यवस्था ठेकेदार यांनी करावयाची आहे.

३) "--- Water and electricity provided by the trust free of charge" अशी अट नमूद आहे:- निविदा शर्तीनुसार विज कनेक्शन संस्थान देणार आहे. परंतू ते विनामूल्य देणेबाबत तरतूद नाही. तसेच संस्थानकडून एका लोकेशनला पाणी कनेक्शन विनामुल्य देण्याची तरतूद आहे.

मे.साराप्लास्ट प्रा.लि., पुणे (व्दितीय निम्नतमधारक) यांनी निम्नतम दरधारक यांचे निविदा दरात काम करणेस असमर्थता दर्शविली असून सुधारीत दर प्रस्तावात वर नमूद अटींचा समावेश केला असल्याने वरील विषयांकित कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदा रद्द करुन याकामी अल्प मुदतीच्या निविदा सूचनेव्दारे फेर ई-निविदा मागविणेत याव्यात असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र२.४२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन करता, कुंभमेळा कालावधीत साईभक्तांचे सोयीसाठी शिर्डी व परिसरात नियोजीत वाहनतळांवर पोर्टेबल टॉयलेट व युरीनल्स भाडेतत्वावर घेणेकामीच्या निविदाप्रक्रियेमधील निम्नतम दरधारक वायएलडीए प्रा.लि ., पुणे हे तांत्रिकदृष्टया अपात्र ठरत असल्यामुळे याकामी फक्त दोनच निविदा उरतात. त्यामुळे कामाची निकड व उपलब्ध कालावधी पहाता सदरहूकामी अल्पमुदतीच्या फेर-निविदा काढणेत याव्या, असे ठरले.** (बांधकाम विभागप्रमुख -कार्यवाही)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ चे कालावधीत भक्तांच्या सुविधेकरीता संस्थानचे जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळ्या जागेत (साईप्रसाद निवासस्थाने परिसरात) शौचालयाचे बांधकाम करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद –**

| अ.नं. | कलम / तरतुद क्रमांक | कलम / तरतुदीचे शीर्षक | पोटकलम / उपकलम क्रमांक | तरतुद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १४ | समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये | २ (घ) | **भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.** |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्थापाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहुन,**समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते अधिकार असतील.** |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (ग) | **भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी** व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी **सोयी व सुविधा पुरविणे.** |

**मा उच्च न्यायालयाचे आदेश-** पी.आय.एल.१८/२०११ मधील सिव्हील अर्ज क्र. १२०५६/२०१२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१६/१०/२०१२ रोजीचे आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाचे पूर्वपरवानगी शिवाय समितीने मोठया स्वरुपाचे आर्थिक निर्णय घेऊ नयेत असे निर्देश दिलेले आहेत.

**प्रस्तावना–** संन २०१५ चे कुंभमेळा कालावधीत साधारणतः २७ ऑगस्ट, २०१५ ते २६ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत मुख्य शाही स्नानाच्या तिथी असल्याने जास्तीत जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरीक्त सोयीसुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने वर नमूद गर्दीचे कालावधीत भक्तांसाठी करावयाचे अतिरीक्त सुविधांमध्ये साईभक्तांच्या वाहनांसाठी वाहनतळे तयार करणे, जड वाहतूक बाह्यवळण रस्त्याने वळविणे, तात्पुरत्या स्वरुपाची निवासव्यवस्था, अतिरीक्त दर्शनरांग व्यवस्था, सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, (विशेषतः महिलासाठी) पाणी पुरवठा, सुरक्षा, अतिरीक्त प्रसाद भोजन व्यवस्था, अल्पोहार इत्यादी, सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणे प्रस्तावित आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये होणा-या श्री साईबाबा महासमाधि शताब्दी महोत्सवाचे कालावधीत होणारे संभाव्य गर्दीचे अनुषंगाने करावयाचे सोयी-सुविधांचे नियोजन करणेत येत आहे.

सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनायझेशन, महाराष्ट्र राज्य, मुंबई शाखेने दि.२७/११/२०१४ रोजीचे पत्रानुसार शिर्डी येथे भक्तांच्या सोईसुविधेसाठी स्वच्छता गृहे व स्नानगृहे उभारणेकामी प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. त्रिसदस्य समितीचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ०५ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"....उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५-१६ मध्ये शिर्डी येथे होणा-या संभाव्य गर्दीचे अनुषंगाने शौचालय बांधकाम करणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन आणि मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरगाबांद खंडपिठाची परवानगी घेण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली. त्यासाठी समिती सदस्यांनी संयुक्तिक पहाणी करुन संबधीत परीसराच्या उपलब्धतेनुसार तीन ठिकाणी जागा निश्चित कराव्यात, असे ठरले."

उपरोक्त निर्णयानुसार दि.२६/०४/२०१५ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे मा. अध्यक्ष-तथा-प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश, अहमदनगर. मा. सदस्य-तथा-जिल्हाधिकारी, अहमदनगर तसेच मा. सदस्य-तथा-कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालील तीन जागाची पहाणी करुन त्यांना मान्यता दिलेली आहे.

१. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५००खोल्यां) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूचे मोकळया जागेत.
२. शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागत कक्ष) जागेत.
३. जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत (साईप्रसाद निवासस्थाने परीसरात)

**प्रस्तावः-** उपरोक्तपैकी जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत (साईप्रसाद निवासस्थाने परीसरात) शौचालयाचे बांधकाम करणेकरीता नकाशे व अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. जिल्हा दर सुची २०१४-१५ नुसार सदर ठिकाणी शौचालयाचे बांधकामासाठी रु.९,७०,१९२/- मात्र खर्च येईल. याकामी येणारा खर्च हा रक्कम रू १० लक्ष मात्रचे खर्चापेक्षा कमी असल्यामुळे याकामी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपिठ, औरंगाबाद यांची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

तरी साईभक्तांच्या सुविधेकरीता संस्थानचे उपरोक्त ठिकाणी शौचालयाचे बांधकाम करणेसाठी येणारे अंदाजे रक्कम रु.९,७०,१९२/- मात्रचे खर्चास व याकामी वर्तमान पत्रातील जाहीरातीव्दारे ई- निविदा मागविणेस मान्यता मिळणेसाठी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२४३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नाशिक सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ चे कालावधीत भक्तांच्या सुविधेकरीता संस्थानचे जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळ्या जागेत (साईप्रसाद निवासस्थाने परिसरात) शौचालयाचे बांधकाम करणेकामी वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,७०,१९२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा विषय नं.०४ **नाशिक सिंहस्थ- कुंभमेळा २०१५ चे कालावधीत भक्तांच्या सुविधेकरीता शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागत कक्ष) संस्थानचे जागेत शौचालयाचे बांधकाम करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद –**

| अ.नं. | कलम / तरतुद क्रमांक | कलम / तरतुदीचे शीर्षक | पोटकलम / उपकलम क्रमांक | तरतुद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १४ | समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये | २ (घ) | **भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.** |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्थापाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | **सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहुन, **समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते अधिकार असतील.** |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (ग) | **भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी** व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी **सोयी व सुविधा पुरविणे.** |

**मा उच्च न्यायालयाचे आदेश-** पी.आय.एल.१८/२०११ मधील सिव्हील अर्ज क्र. १२०५६/२०१२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१६/१०/२०१२ रोजीचे आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाचे पूर्वपरवानगी शिवाय समितीने मोठया स्वरुपाचे आर्थिक निर्णय घेऊ नयेत असे निर्देश दिलेले आहेत.

**प्रस्तावना–** संन २०१५ चे कुंभमेळा कालावधीत साधारणतः २७ ऑगस्ट, २०१५ ते २६ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत मुख्य शाही स्नानाच्या तिथी असल्याने जास्तीत जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरीक्त सोयीसुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने वर नमूद गर्दीचे कालावधीत भक्तांसाठी करावयाचे अतिरीक्त सुविधांमध्ये साईभक्तांच्या वाहनांसाठी वाहनतळे तयार करणे, जड वाहतूक बाह्यवळण रस्त्याने वळविणे, तात्पुरत्या स्वरुपाची निवासव्यवस्था, अतिरीक्त दर्शनरांग व्यवस्था, सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, (विशेषतः महिलासाठी) पाणी पुरवठा, सुरक्षा, अतिरीक्त प्रसाद भोजन व्यवस्था, अल्पोहार इत्यादी, सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणे प्रस्तावति आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये होणा-या श्री साईबाबा महासमाधि शताब्दी महोत्सवाचे कालावधीत होणारे संभाव्य गर्दीचे अनुषंगाने करावयाचे सोयी-सुविधांचे नियोजन करणेत येत आहे.

सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनायझेशन, महाराष्ट्र राज्य, मुंबई शाखेने दि.२७/११/२०१४ रोजीचे पत्रानुसार शिर्डी येथे भक्तांच्या सोईसुविधेसाठी स्वच्छता गृहे व स्नानगृहे उभारणेकामी प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. त्रिसदस्य समितीचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ०५ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

“.. ..उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५-१६ मध्ये शिर्डी येथे होणा-या संभाव्य गर्दीचे अनुषंगाने शौचालय बांधकाम करणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन आणि मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरगाबांद खंडपिठाची परवानगी घेण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली. त्यासाठी समिति सदस्यांनी संयुक्तिक पहाणी करुन संबधीत परीसराच्या उपलब्धतेनुसार तीन ठिकाणी जागा निश्चित कराव्यात, असे ठरले.”

उपरोक्त निर्णयानुसार दि.२६/०४/२०१५ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे मा. अध्यक्ष-तथा-प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश, अहमदनगर. मा. सदस्य-तथा-जिल्हाधिकारी, अहमदनगर तसेच मा. सदस्य-तथा-कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालील तीन जागाची पहाणी करुन त्यांना मान्यता दिलेली आहे.

1. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५००खोल्यां) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूचे मोकळया जागेत.
2. शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागत कक्ष) जागेत.
3. जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत (साईप्रसाद निवासस्थाने परीसरात)

**प्रस्ताव:-** उपरोक्तपैकी शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागत कक्ष) संस्थानचे जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकरीता नकाशे व अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. जिल्हा दर सुची २०१४-१५ नुसार सदर ठिकाणी शौचालयाचे बांधकामासाठी रु.९,७०,१९२/- मात्र खर्च येईल. याकामी येणारा खर्च हा रक्कम रू १० लक्ष मात्रचे खर्चापेक्षा कमी असल्यामुळे याकामी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपिठ, औरंगाबाद यांची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

तरी साईभक्तांच्या सुविधेकरीता संस्थानचे उपरोक्त ठिकाणी शौचालयाचे बांधकाम करणेसाठी येणारे अंदाजे रक्कम रु.९,७०,१९२/- मात्रचे खर्चास व याकामी वर्तमान पत्रातील जाहीरातीव्दारे ई- निविदा मागविणेस मान्यता मिळणेसाठी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२४४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नाशिक सिंहस्थ- कुंभमेळा २०१५ चे कालावधीत भक्तांच्या सुविधेकरीता शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागत कक्ष) संस्थानचे जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकामी वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,७०,१९२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा विषय नं.०५ **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०१५ चे कालावधीत भक्तांच्या सुविधेकरीता संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान परिसरात शौचालयाचे बांधकाम करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद –**

| अ.नं. | कलम / तरतुद क्रमांक | कलम/ तरतुदीचे शीर्षक | पोटकलम / उपकलम क्रमांक | तरतुद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १४ | समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये | २ (घ) | **भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.** |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्थापाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहुन,समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते अधिकार असतील. |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (ग) | भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. |

**मा उच्च न्यायालयाचे आदेश-** पी.आय.एल.१८/२०११ मधील सिव्हील अर्ज क्र. १२०५६/२०१२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१६/१०/२०१२ रोजीचे आदेशान्वये मा. उच्च न्यायालयाचे पूर्वपरवानगी शिवाय समितीने मोठया स्वरुपाचे आर्थिक निर्णय घेऊ नयेत असे निर्देश दिलेले आहेत.

**प्रस्तावना** – संन २०१५ चे कुंभमेळा कालावधीत साधारणतः २७ ऑगस्ट, २०१५ ते २६ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत मुख्य शाही स्नानाच्या तिथी असल्याने जास्तीत जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरीक्त सोयीसुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने वर नमूद गर्दीचे कालावधीत भक्तांसाठी करावयाचे अतिरीक्त सुविधांमध्ये साईभक्तांच्या वाहनांसाठी वाहनतळे तयार करणे, जड वाहतूक बाह्यवळण रस्त्याने वळविणे, तात्पुरत्या स्वरुपाची निवासव्यवस्था, अतिरीक्त दर्शनरांग व्यवस्था, सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, (विशेषतः महिलासाठी) पाणी पुरवठा, सुरक्षा, अतिरीक्त प्रसाद भोजन व्यवस्था, अल्पोहार इत्यादी, सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणे प्रस्तावति आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये होणा-या श्री साईबाबा महासमाधि शताब्दी महोत्सवाचे कालावधीत होणारे संभाव्य गर्दीचे अनुषंगाने करावयाचे सोयी-सुविधांचे नियोजन करणेत येत आहे.

सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनायझेशन, महाराष्ट्र राज्य, मुंबई शाखेने दि.२७/११/२०१४ रोजीचे पत्रानुसार शिर्डी येथे भक्तांच्या सोईसुविधेसाठी स्वच्छता गृहे व स्नानगृहे उभारणेकामी प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. त्रिसदस्य समितीचे **दि.३०/०१/२०१५** रोजीचे सभेतील **निर्णय क्रं. ०५** अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

".. ..उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिहंस्थ कुंभमेळा सन २०१५-१६ मध्ये शिर्डी येथे होणा-या संभाव्य गर्दीचे अनुषंगाने शौचालय बांधकाम करणेसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन आणि मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरगाबांद खंडपिठाची परवानगी घेण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली. त्यासाठी समिती सदस्यांनी संयुक्तिक पहाणी करुन संबधीत परीसराच्या उपलब्धतेनुसार तीन ठिकाणी जागा निश्चित कराव्यात, असे ठरले."

उपरोक्त निर्णयानुसार दि.२६/०४/२०१५ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे मा. अध्यक्ष-तथा-प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश, अहमदनगर. मा. सदस्य-तथा-जिल्हाधिकारी, अहमदनगर तसेच मा. सदस्य-तथा-कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालील तीन जागाची पहाणी करुन त्यांना मान्यता दिलेली आहे.

1. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५००खोल्यां) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूचे मोकळया जागेत.
2. शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागत कक्ष) जागेत.
3. जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत (साईप्रसाद निवासस्थाने परीसरात)

**प्रस्ताव**:- उपरोक्तपैकी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान परिसरासमोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पूर्व बाजूचे मोकळया जागेत शौचालयाचे बांधकाम करणेकरीता नकाशे व अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. जिल्हा दर सुची २०१४-१५ नुसार सदर ठिकाणी शौचालयाचे बांधकामासाठी रु.९,७०,१९२/- मात्र खर्च येईल. याकामी येणारा खर्च हा रक्कम रू १० लक्ष मात्रचे खर्चापेक्षा कमी असल्यामुळे याकामी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपिठ, औरंगाबाद यांची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.

तरी साईभक्तांच्या सुविधेकरीता संस्थानचे उपरोक्त ठिकाणी शौचालयाचे बांधकाम करणेसाठी येणारे अंदाजे रक्कम रु.९,७०,१९२/- मात्रचे खर्चास व याकामी वर्तमान पत्रातील जाहीरातीव्दारे ई- निविदा मागविणेस मान्यता मिळणेसाठी निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२४५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०१५ चे कालावधीत भक्तांच्या सुविधेकरीता संस्थानचे श्री साईबाबा भक्तनिवासस्थान परिसरात शौचालयाचे बांधकाम करणेकामी वर्तमानपत्रातील जाहिरातीद्वारे ई-निविदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,७०,१९२/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **सिंहस्थ कुंभमेळ्याकरीता (दि.२५ ऑगष्ट,२०१५ ते दि.३० सप्टेंबर,२०१५ अखेर) पोलिस यंत्रणेसाठी दर्शनरांग येथे लाऊडस्पिकर लावणेसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उपविभागीय पोलिस अधिकारी, शिर्डी यांनी भक्तांसाठी वाढीव दर्शनरांगेसाठी तथा नगर मनमाड रोडवरील साईआश्रम-०१ ते प्रसादालय कॉर्नरपर्यंत विविध सेक्टरमध्ये साधारणपणे ३७ दिवसांसाठी अनाऊंन्समेंट सिस्टीम तात्पुरते उभारण्यासाठी ०२ प्रस्ताव सादर केलेले आहेत. यासाठी इलेक्ट्रॉनिक्स कॉन्ट्रॅक्टर प्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष पहाणी करून प्राथमिक खर्चाचा आढावा मा.उपविभागीय पोलिस अधिकारी,शिर्डी यांचेमार्फत संस्थानला सादर केलेला आहे.

याचे सविस्तर अध्ययन केले असता १८२ स्पिकर (ट्रॅम्पेट) अपेक्षित आहे व सदरची यंत्रणा करण्यासाठी त्यांनी लाईटव्यवस्था, ३० मिनीटांचा बॅटरी बॅकअप व वायरींग मेंटनन्स व ऑपरेटींगकरीता कुशल कर्मचारी याचा एकत्रीत प्रस्ताव त्यांनी देऊ केलेला आहे, तो खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No | Route | Point | Horns |
|---|---|---|---|
| 01 | Sector No.-01 From Prasadalaya to Coffee Cafe Day (CCD) main road corner | 06 | 12 |
| 02 | Sector No.-02 From VIP Rest House to Gate No-01 | 15 | 30 |
| 03 | Sector No.-03 From Gate No 01 to Saish Hotel | 08 | 16 |
| 04 | Sector No.-04 From Saish Hotel to Pimpalwadi Chowk | 13 | 26 |
| 05 | Sector No.-05 From Pimpalwadi Chowk to RBL Bank Corner | 08 | 16 |
| 06 | Sector No.-06 From Gate No-01 corner to Pimpalwadi Chowk | 12 | 24 |
| 07 | Sector No.-07 From Dwaravati Bhaktaniwas Corner to Pimpalwadi Chowk | 07 | 14 |
| 08 | Sector No.-08 From Gate No-04 to Baba Chavadi to Gate No-04 Main Road Chowk | 15 | 30 |
| 09 | Sector No.-01 From Jhulelal Temple to New Bridge on Main Road | 07 | 14 |
| | **Total** | **91** | **182** |

तसेच पोलिस यंत्रणेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावातील पर्याय क्र.०१ हे तांत्रिकदृष्या व मेंन्टनन्सच्या दृष्टीने योग्य वाटत आहे.परंतू सदरचे ठिकाणी कोणतीही CCTV यंत्रणा बसविण्याचे प्रस्तावित नसल्याचे समजते. सदर प्रकल्पाअंतर्गत १८२ स्पिकर पोलिस वाहतूक नियंत्रण कक्षात जोडण्यात येणार आहे व तेथून ती ऑपरेट करता येणार आहे. सदरची यंत्रणा फक्त पोलिस यंत्रणेसाठी प्रस्तावीत आहे. यासाठी सर्वसमाविष्ट एकत्रीत खर्च (दि.२५ ऑगष्ट,२०१५ ते दि.३० सप्टेंबर,२०१५ अखेर) ३७ दिवसांचे कालावधीत खालीलप्रमाणे आहे.

| **Sr.No** | **Route** | **QTY** | **Days** | **Points** | **Amount** |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Total Horns in Centralize & Sector Control with Light + Backup for 30 min+ wiring+ maintenance+ with sufficient man power | 182 | 37 | 91 | 22,95,500/- |
| 02 | All type of Taxes | | | | Tax will Extra |
| **03** | **Total** | | | | **22,95,500/-+Taxes** |

तरी वरीलप्रमाणे नमुद केलेप्रमाणे सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कालावधीसाठी विकसीत करण्यात येणा-या अनाऊंन्समेंट सेंटरसाठी ई-निविदा राबवावी लागणार आहे यासाठी लागणारी NOC पोलिस यंत्रणेद्वारे घेता येईल. सदरील यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी शिर्डी पोलिस ठाण्यातील वाहतूक नियंत्रण कक्षामध्ये सदरचा मध्यवर्ती अनाऊंन्समेंट सेंटर तयार करण्यात येणार आहे.

उपरोक्तप्रमाणे सिंहस्थ कालावधीत दि.२५ ऑगष्ट,२०१५ ते दि.३० सप्टेंबर,२०१५ अखेर ३७ दिवसांचे कालावधीत पोलिस यंत्रणेला मध्यवर्ती अनाऊंन्समेंट सेंटरसाठी एकत्रीत रक्कम रूपये २२.९६ लाख + टॅक्सेस अशी अंदाजे रूपये २६,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये सव्वीस लाख मात्र) खर्चाची मान्यता मिळणेसाठी सविनय सादर

निर्णय क्र.२४६ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे सिंहस्थ कुंभमेळ्याकरीता (दि.२५ ऑगष्ट,२०१५ ते दि.३० सप्टेंबर,२०१५ अखेर) ३७ दिवसांचे कालावधीसाठी पोलिस यंत्रणेला मध्यवर्ती अनाऊंन्समेंट सेंटरची यंत्रणा भाडेतत्वावर उपलब्ध करुन देणेकामी वेळेची मर्यादा लक्षात घेता, तातडीने अल्पमुदतीच्या ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२२.९६ लाख + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

पोलीस विभागाने त्यांचेकडील दि.३०/७/२०१५ रोजीचे पत्रान्वये सदरहू यंत्रणा भाडेतत्वावर मिळणे बाबत प्रस्ताव दिलेला असल्यामुळे याकामीच्या खर्चाची तरतुद मा.उच्च न्यायालयाने सिंहस्थ कुंभमेळयासाठी मंजूर केलेल्या रु.५७ कोटी मात्र रकमेमध्ये नाही. परंतु भाविकांच्या सोयी व सुरक्षीततेच्या दृष्टीने कुंभमेळा कालावधीमध्ये मध्यवर्ती अनाऊंन्समेंट सेंटरची व्यवस्था करणे अत्यावश्यक असल्याकारणाने याकामी येणारा खर्च मा.उच्च न्यायालयाने सिंहस्थ कुंभमेळयासाठी मंजूर केलेल्या रु.५७ कोटी मात्र रकमेमधुन करणेत यावा व याबाबत मा.उच्च न्यायालयास माहितीसाठी सिव्हील अर्ज सादर करणेत यावा.

पोलिस विभागासमवेत एकत्रित पहाणी करुन आपल्याला कशा प्रकारे यंत्रणा पाहिजे व कोणत्या ठिकाणी, किती भोंगे बसवावयाचे आहेत हे निश्चित करुन, तशा प्रकारे निविदाधारकांना निविदा भरावयास सांगणेत यावे.

तसेच सदरहू यंत्रणा कायमस्वरुपी खरेदी केल्यास किती खर्च येईल व भाडेतत्वावर घ्यावयाची झाल्यास किती खर्च येईल याबाबतची तपशीलवार माहिती सभेस सादर करावी, असे ठरले.

(कार्यवाही- ध्वनिक्षेपण विभागप्रमुख/ विधी अधिकारी)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०७ **पोलीस विभागाकरीता लोखंडी बॅरीकेडस् तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** बांधकाम विभाग (कुंभमेळा-शताब्दी कक्ष) यांनी त्यांचेकडील दिनांक 31/07/2015 रोजीचे पत्राव्दारे सिहस्थ कुंभमेळा 2015 कालावधीत शिर्डी येथे होणा-या गर्दीचे नियोजनाकरीता पोलीस विभागाचे मागणीनुसार कुंभमेळा कालावधीसाठी मेकॅनिकल विभागाकडून तातडीने 500 नग लोखंडी बॅरीकेडस् खरेदी करणेसाठी यथोचित कार्यवाही करण्यात यावी असे कळविलेले आहे.

नाशिक सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी होणार असल्याने संस्थानचे संरक्षण विभागाकरीता विविध ठिकाणी बॅरीकेडींग करणेकरीता मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक 30/01/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 6 तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक 06/05/2015 रोजीचे आदेशान्वये लोखंडी बॅरीकेडस तयार करुन पुरविणेकामी इकडील विभागामार्फत निविदा तयार करुन वर्तमानपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. याकामी पाच निविदाधारकांनी ई-निविदा अपलोड केलेल्या होत्या. प्राप्त झालेल्या ई-निविदांच्या कागदपत्रांची छाननी करुन पात्र निविदाधारकांचे कमर्शियल बीड दिनांक 22/06/2015 रोजी उघडण्यात आले असता, यातील प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे :

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | 100 नग राऊंड पाईप बॅरीकेडसकरीता दर | 25 नग सी चॅनेल बॅरीकेडसकरीता दर | इतर (वाहतुक) चार्जेस | एकूण दर रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | मे. रत्ना इंजिनिअर्स, पुणे | 6,05,095/- | 1,05,370/- | 15,000/- | 7,25,465/- |
| 2. | मे. अपूर्वा इंजिनिअरींग, औरंगाबाद | 6,05,900/- | 1,13,200/- | 10,000/- | 7,29,100/- |
| 3. | मे. चंद्रगुप्त कंन्स्ट्रक्शन, साकुरी | 5,15,100/- | 82,860/- | 100/- | 5,98,060/- |
| 4. | मे. साई इंजिनिअर्स, नाशिक | 6,09,000/- | 1,10,400/- | 10,000/- | 7,29,400/- |
| **5.** | **मे.प्रेस-व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर** | 4,57,485/- | 93,200/- | 7,500/- | **5,58,185/-** |

उपरोक्त तपशीलानुसार राऊंड पाईप बॅरीकेडस् 100 नग व सी चॅनल बॅरीकेडस 25 नग तयार करुन पुरविणेकामी मे. प्रेस-व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर यांनी देऊ केलेले एकत्रित दर निम्नतम असल्याने त्यांचे निम्नतम दर स्विकारुन त्यांना मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 24/06/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 164 चे मान्यतेने इकडील जा.नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/1718/2015 दिनांक 26 जून, 2015 नुसार कार्यादेश देण्यात आलेला आहे.

सिंहस्थ कुंभमेळा 2015 पर्वणीकरीता राहीलेल्या अल्प कालावधीचा विचार करता तसेच कामाची निकड बघता गर्दीचे नियोजनाकरीता पोलीस विभागाचे मागणीनुसार 500 नग राऊंड पाईप लोखंडी बॅरीकेडस तयार करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणे वेळेअभावी शक्य नाही. शासकीय विश्रामगृह पासून मंदिराकडे तसेच साईआश्रमपासून मंदिराकडे जाणा-या दर्शन रांगेकरीता संस्थानमार्फत बॅरीकेडीग करणेत येणार असल्यामुळे व कमी कालावधी उपलब्ध असल्यामुळे पोलीस विभागास त्यांचे मागणीनुसार 500 ऐवजी 300 नग बॅरीकेडस तातडीने उपलब्ध करुन देता येतील. सदरील 300 नग लोखंडी बॅरीकेडस् संस्थान संरक्षण विभागाकरीता बॅरीकेडस तयार करुन पुरविणेकामी झालेल्या ई-निविदा प्रक्रियेव्दारे प्राप्त निम्नतम (100 नग लोखंडी बॅरीकेडसकरीता रुपये 4,64,985/-) दरात तयार करुन घेता येतील. सदर दरानुसार 300 नग लोखंडी बॅरीकेडस तयार करुन घेणेकामी रुपये 13,94,955/- मात्रचा (वाहतुकीसह) खर्च येईल.

कुंभमेळा कालावधीत होणा-या गर्दीचे अनुषंगाने उपलब्ध करावयाच्या सोयी-सुविधांकरीता मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी रुपये 57.54 कोटी खर्चाचे प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. सदरचे मान्यता मिळालेल्या खर्चामध्ये पोलीस विभागाचे मागणीनुसार 500 लोखंडी बॅरीकेडस तयार करणेकामी येणा-या रुपये 32,50,000/- मात्रचे खर्चाचा समावेश आहे

संस्थान संरक्षण विभागाकरीता लोखंडी बॅरीकेडस तयार करुन पुरविणेकामी केलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक (L-1) मे. प्रेस-व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर यांना, त्याच मान्य दरात वाढीव बॅरीकेडस तयार करुन पुरविणेबाबत विचारणा केली असता त्यांनी दिनांक 31/07/2015 चे ई-मेल पत्राव्दारे मंजूर दरातच दिनांक 20/08/2015 अखेरपर्यंत 100 नग बॅरीकेडस पुरविणेस तयार असलेबाबत कळविले आहे. तसेच उर्वरित 200 नग बॅरीकेडस तयार करणेबाबत L-2 असलेले मे. चंद्रगुप्त कन्स्ट्रक्शन, साकुरी यांना विचारणा केली असता, त्यांनी दिनांक 31/07/2015 चे लेखी पत्राव्दारे मंजूर (L-1) दरात 200 नग बॅरीकेडस दिनांक 20/08/2015 पर्यंत तयार करुन पुरविणेस तयार असलेबाबत कळविले आहे.

तरी पोलीस विभागास सिंहस्थ कुंभमेळानिमित्त शिर्डी येथे होणा-या गर्दीचे नियोजनाकरीता 300 नग लोखंडी बॅरीकेडस तयार करुन पुरविणेकामी येणा-या रुपये 13,94,955/- मात्रचे खर्चास व त्याअनुषंगाने (1) मे. प्रेस-व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर यांना 100 नग लोखंडी बॅरीकेडस तयार करुन पुरविणेकामी रक्कम रुपये 4,64,985/- तसेच (2) मे. चंद्रगुप्त कन्स्ट्रक्शन, साकुरी यांना 200 नग लोखंडी बॅरीकेडस तयार करुन पुरविणेकामी रुपये 9,29,970/-रकमेचा कार्यादेश देणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२४७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळानिमित्त शिर्डी येथे होणा या गर्दीचे नियोजनाकरीता-पोलीस विभागास ३०० नग लोखंडी बॅरीकेडस पुरविणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व यासाठी येणा-या रु.१३,९४,९५५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू खर्च मा.उच्च न्यायालयाने सिंहस्थ कुंभमेळयासाठी मान्यता दिलेल्या रु.५७ कोटी मात्र रकमेमधून करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.२३९ ते २४७ सर्वानुमते घेण्यात आला.
यानंतर रात्रौ ०९.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-xxx | स्वाक्षरित/- xxx | स्वाक्षरित/- xxx |
| (राजेंद्र जाधव) | (अनिल कवडे) | (विनय जोशी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी